आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता
१४ सप्टेंबर २०२६ - सोमवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- १० दिवस चालणाऱ्या गणेशोत्सवाला प्रारंभ/ देशात सर्वत्र सणाचा उत्साह

- घाऊक किमतीवर आधारित चलन फुगवट्याच्या दरात ९ पूर्णांक ९२ शतांश टक्के वाढ

- दिशा सालियान मृत्यू प्रकरणी सीबीआयनं केला एफआयआर दाखल

- गोवा नाइट क्लब आग प्रकरणी, क्लब मालक गौरव लुथरा आणि सौरभ लुथरा पोलिसांना शरण

**<u>आणि</u>**

- अमेरिकन खुल्या टेनिस स्पर्धेत अलेक्झांडर झ्वेरेव्ह अजिंक्य

**<><><><><>**

आज भाद्रपद शुद्ध चतुर्थी म्हणजेच गणेशचतुर्थी. १० दिवस चालणाऱ्या गणेशोत्सवाचा प्रारंभ आज झाला. गणेश चतुर्थीनिमित्त राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी देशवासियांना शुभेच्छा दिल्या आहेत. श्रीगणेश सर्वांच्या जीवनात सुख, शांती, उत्तम आरोग्य आणि समृद्धी घेऊन येवोत, अशी प्रार्थना त्यांनी आपल्या शुभेच्छा संदेशात केली आहे. उपराष्ट्रपती सी पी राधाकृष्णन यांनीही गणेशोत्सवानिमित्त शुभेच्छा दिल्या आहेत. गणेशोत्सव नवी ऊर्जा आणि चैतन्य घेऊन येतो, श्री गणेशाच्या आशीर्वादाने देशाची प्रगतीच्या मार्गावर अखंड वाटचाल होत राहो, अशा शब्दात प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी शुभेच्छा दिल्या आहेत.

महाराष्ट्रात सुरु झालेला हा उत्सव आता राज्यउत्सव म्हणून साजरा केला जातो. ऐकूया त्याचा थोडक्यात वृत्तांत....

**- - - - व्हॉईस कास्ट- शैलेश - --**

*(मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज मुंबईत वर्षा निवासस्थानी पार्थिव गणेशमूर्तीची प्रतिष्ठापना करुन सपत्नीक पूजा केली. मुंबईसह राज्यात सर्वत्र घरोघरी गणेशमूर्तींची स्थापना होत आहे. आजच हरितालिका तृतीया असल्यानं सकाळी घरोघरी हरितालिकेच्या मूर्तींची स्थापना आणि पूजा करण्यात आली. पर्यावरण स्नेही साहित्यापासून बनवलेल्या मूर्ती आणि सजावटीला पसंती मिळत आहे. सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांच्या मोठमोठ्या मूर्ती आधीच*

*मंडपात विराजमान झाल्या असून आता हळू हळू दर्शनासाठी रांगा लागू लागल्या आहेत. श्रींच्या आगमनासाठी यंदा ध्वनी प्रदूषण रोखण्याच्या दृष्टीनं पारंपरिक वाद्यांच्या वापरावर भर दिल्याचं दिसतं. प्रसाद आणि मिठाई खरेदी करताना ग्राहक विशेष सावधगिरी बाळगत आहेत. गणेशोत्सवानिमित्त विविध कल्याणकारी उपक्रम राबवण्यात येत असून सांस्कृतिक कार्यक्रमांची रेलचेल आहे. राज्यशासनातर्फे तसंच इतर संस्थांतर्फे गणेशोत्सव सजावटीच्या स्पर्धा आयोजित करण्यात आल्या आहेत. सार्वजनिक गणेशोत्सवाची जन्मभूमी असलेल्या पुण्यात मानाच्या ५ गणपतींसह विविध गणेश मंडळांच्या मूर्तींची प्रतिष्ठापना होत आहे. पुण्यातही पारंपरिक वाद्यांवर भर दिल्याचं दिसतं.गणेशोत्सवादरम्यान गर्दीचा विचार करुन ठिकठिकाणी वाहतुकीचं नियोजन करण्यात आलं आहे. पोलीस बंदोबस्तही ठेवला आहे.)*

गणेशचतुर्थी निमित्त सार्वजनिक सुट्टी असल्यानं आज दोन्ही शेअर बाजार बंद आहेत.

देशात इतरत्रही गणेशोत्सव साजरा होत आहे. सर्वत्र लहानमोठ्या प्रमाणात साजरा होणारा हा उत्सव आता परदेशातही साजरा होतो.

**<><><><>**

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या हस्ते आज नवी मुंबईत वाशी इथं हिंदी दिवस २०२६ आणि सहावं अखिल भारतीय राजभाषा संमेलन होत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि सुनेत्रा पवार यांच्यासह इतर या कार्यक्रमाला उपस्थित आहेत. यावेळी शहा यांनी राजभाषा गौरव आणि राजभाषा कीर्ती पुरस्कारांचं वितरण केलं.

**<><><><>**

नवी दिल्लीत १८ वी ब्रिक्स शिखर परिषद यशस्वीपणे आयोजित करण्यासाठी सहाय्य केल्याबद्दल परराष्ट्र व्यवहार मंत्रालयानं केंद्र सरकारच्या सर्व विभागांचे आणि संस्थांचे आभार मानले आहेत. या शिखर परिषदेचं आयोजन म्हणजे एक गुंतागुंतीची प्रक्रिया होती, मात्र सर्वांच्या सहकार्यानं ती यशस्वी झाली, असं मंत्रालयानं म्हटलं आहे. विविध ब्रिक्स बैठका आयोजित केल्याबद्दल सर्व राज्य सरकारांचे आभारही मानले आहेत.

**<><><><>**

संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी १८ व्या ब्रिक्स शिखर परिषदेच्या यशस्वितेबद्दल प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं अभिनंदन केलं आहे. ऐतिहासिक नवी दिल्ली जाहीरनामा म्हणजे

नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारताचा जागतिक प्रभाव वाढत असल्याचं द्योतक आहे, असं त्यांनी म्हटलं आहे.

<><><><><>

अन्नपदार्थ, इंधन , ऊर्जा तसंच औद्योगिक उत्पादनांच्या किमतीत वाढ झाल्यानं ऑगस्ट महिन्यात घाऊक किमतीवर आधारित चलन फुगवट्याच्या दरात ९ पूर्णांक ९२ शतांश टक्के वाढ झाली. जुलै महिन्यात ही वाढ ९ पूर्णांक ७८ शतांश टक्के नोंदवली गेली होती. केंद्र सरकारनं आज ही आकडेवारी जाहीर केली. जुलै महिन्यात ६ पूर्णांक ६५ शतांश टक्के वाढ दाखवणारा अन्नपदार्थ निर्देशांक ऑगस्ट महिन्यात ७ पूर्णांक ५ शतांशांनी वाढला, इंधन आणि ऊर्जा क्षेत्रांचा घाऊक किंमतीवर आधारित चलन फुगवट्याचा दर २२ पूर्णांक ९३ शतांश टक्के राहिला.

पश्चिम आशियातली युद्ध परिस्थिती आणि त्यामुळे झालेली होर्मुझ सामुद्रधुनीची नाकेबंदी यामुळे घाऊक किंमत निर्देशांकानं वरच्या दिशेनं प्रवास केला आहे, असं वाणिज्य आणि उद्योग मंत्रालयानं म्हटलं आहे.

<><><><><>

दिशा सालियान मृत्यू प्रकरणी सीबीआयनं एफआयआर दाखल करून घेतला आहे. दिशा ही दिवंगत अभिनेता सुशांत सिंह राजपूत याची मॅनेजर होती आणि ८ जून २०२० रोजी इमारतीच्या १२व्या मजल्यावरून पडून तिचा मृत्यू झाला होता. या प्रकरणी एफआयआर दाखल करायचे आदेश मुंबई उच्च न्यायालयानं दिले होते. त्यानुसार, हा एफआयआर काल दाखल झाला आहे. तत्कालीन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, आदित्य ठाकरे, त्यांचे सुरक्षारक्षक, दिनो मोरिया, रोहन रॉय, सूरज पंचोली, रिया चक्रवर्ती, शोविक चक्रवर्ती, पोलीस अधिकारी सचिन वाझे, परमबीर सिंह यांच्यासह इतर अनेक जणांचा उल्लेख एफआयआरमध्ये करण्यात आला आहे.

<><><><><>

गोवा नाइट क्लब आग प्रकरणी, त्या नाइट क्लबचे मालक गौरव लुथरा आणि सौरभ लुथरा यांनी आत्मसमर्पण केलं आहे. त्यांचा जामीन रद्द करण्याच्या मुंबई उच्च न्यायालयाच्या निर्णयावर सर्वोच्च न्यायालयानं शिक्कामोर्तब केल्यानंतर या दोघांनी आज म्हापसा सत्र

न्यायालयासमोर आत्मसमर्पण केलं. त्यांच्या नाईट क्लबमध्ये गेल्या वर्षी ६ डिसेंबर रोजी लागलेल्या आगीत २५ जणांचा मृत्यू झाला होता.

<><><><><>

जागतिक आरोग्य संघटनेचे महासंचालक टेड्रोस घेब्रेयसस यांनी अधिक चांगलं आरोग्य सहकार्य, नवोन्मेष, काटकपणा आणि शाश्वत वित्तपुरवठा यांची गरज अधोरेखित केली आहे. बिक्स नेत्यांच्या शिखर परिषदेच्या या चार संकल्पना जागतिक आरोग्याशी थेटपणे निगडित आहेत, असं त्यांनी समाज माध्यमांवरच्या पोस्टमध्ये म्हटलं आहे. त्यांनी ब्रिक्स नेत्यांना सज्जता, उत्तरदायित्व आणि दीर्घकालीन वचनबद्धता अधिक बळकट करण्याचं आवाहन केलं.

<><><><><>

अलेक्झांडर झ्वेरेव्हनं अमेरिकन खुल्या टेनिस स्पर्धेच्या पुरुष एकेरीचं विजेतेपद पटकावलं आहे. रात्री उशिरा झालेल्या सामन्यात त्यानं बेन शेल्टनचा ६-३, ७-६, ५-७, ६-२ अशी मात केली. या हंगामातलं झ्वेरेव्हचं हे दुसरं ग्रँडस्लॅम अजिंक्यपद आहे. जून महिन्यात त्यानं फ्रेंच खुल्या टेनिस स्पर्धेचं जेतेपद मिळवलं होतं.

<><><><><>

अमेरिकन खुल्या टेनिस स्पर्धेच्या पहिल्याच फेरीतून बाहेर पडल्यानंतर दिग्गज टेनिसपटू नोव्हाक जोकोविच ८ वर्षांनी जागतिक क्रमवारीत पहिल्या १०मधून बाहेर पडून १२व्या स्थानावर घसरला आहे. सर्वाधिक, ४२८ आठवडे पहिल्या स्थानावर राहण्याचा विक्रम जोकोविचच्या नावावर आहे. ताज्या आकडेवारीनुसार यानिक सिनर पहिल्या, अमेरिकन खुल्या टेनिस स्पर्धेचं अजिंक्यपद पटकावणारा अलेक्झांडर झ्वेरेव्ह दुसऱ्या, तर कार्लोस अल्काराज तिसऱ्या स्थानावर आहे. अमेरिकन ओपनच्या अंतिम फेरीत धडक मारणारा बेन शेल्टन चौथ्या, तर फीलिक्स ऑजर अलियासीम पाचव्या स्थानावर आहे. दुहेरीत भारताचा युकी भांब्री ४४व्या, तर एन. श्रीराम बालाजी ४९व्या स्थानावर आहे.

<><><><><>

महिलांच्या आशिया चषक टी-२० क्रिकेट स्पर्धेत काल भारतीय संघानं श्रीलंकेवर ७२ धावांनी मात केली आणि अजिंक्यपद पटकावलं. या स्पर्धेतलं भारताचं हे विक्रमी ८वं जेतेपद आहे. नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजीला उतरलेल्या भारताच्या संघानं सलामीवीर शफाली

वर्मा आणि स्मृती मंधाना यांच्या १२९ धावांच्या भागीदारीच्या जोरावर ५ खेळाडूंच्या मोबदल्यात १८३ धावांचा डोंगर रचला. भारतीय गोलंदाजांनीही उत्तम कामगिरी करत श्रीलंकेचा संपूर्ण संघ १९ षटकं आणि ४ चेंडूंमध्येच १११ धावांवर तंबूत धाडला. शफाली वर्माला सर्वोत्कृष्ट खेळाडू म्हणून गौरवण्यात आलं.

<><><><><>

भारताचा अग्रमानांकित तिरंदाज धीरज बोम्मदेवरा यानं विश्वचषक स्पर्धेच्या रिकर्व्ह प्रकारात सुवर्णपदकाची कमाई केली. ही कामगिरी करणारा तो पहिला भारतीय पुरुष तिरंदाज ठरला आहे.

<><><><><>

भारत आणि अफगाणिस्तान यांच्यातल्या टी-२० क्रिकेट मालिकेतल्या पहिल्या सामन्यात भारतानं अफगाणिस्तानवर ७ गडी राखून विजय मिळवला आणि मालिकेत १-० अशी आघाडी घेतली. मालिकेतला दुसरा सामना उद्या, तर तिसरा सामना येत्या गुरुवारी होणार आहे.

<><><><><>

देशातल्या नऊ राज्यांमधल्या १४७ कोळसा खंडांचा लिलाव २०२० पासून करण्यात आल्याची माहिती कोळसा मंत्रालयानं दिली आहे. यातून ४७ हजार ५०० कोटी रुपयांचा वार्षिक महसूल आणि सुमारे चार लाख ९० हजार रोजगार उपलब्ध होण्याची अपेक्षा आहे.

//<><><><><>//